महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४४७,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.
दूरध्वनी क्र:-
Email ID:- sm२.sesd-mh@gov.in

क्रमांक:-एसएफएस-१०२२/प्र.क्र.१७७/एसएम-२ दिनांक:- १६ जुलै, २०२४

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
दयानंद फाऊंडेशन,
हडपसर, पुणे, जि. पुणे-२८.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

दयानंद फाऊंडेशन, हडपसर, पुणे संचलित व्यंकटेश्वर वर्ल्ड स्कुल, गट क्र. १९१/२, १९१/३, मौजे नायगांव, ता. मावळ, जि. पुणे.

संदर्भ- इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२२/प्र.क्र.१७७/एसएम-२, दि. ०५.०५.२०२२.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत दयानंद फाऊंडेशन, हडपसर, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून व्यंकटेश्वर वर्ल्ड स्कुल, गट क्र. १९१/२, १९१/३, मौजे नायगांव, ता. मावळ, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून दयानंद फाऊंडेशन, हडपसर, पुणे संचलित व्यंकटेश्वर वर्ल्ड स्कुल, गट क्र. १९१/२, १९१/३, मौजे नायगांव, ता. मावळ, जि. पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ.१२ वी, सर्व शाखा, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई.) स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे:-

३. अटी व शर्ती :-

1) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.